सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय ,नाशिक,(आपत्ती व्यवस्थापन शाखा)**

दुरध्वनी क्र. ०२५३-२३१५०८०/२३१७१५१ E-Mail- ddmanashik@gmail.com फॅक्स क्र.०२५३- २५८१७००

वाचा : १. आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ चे कलम ३०, ३३, ३४,४१ व कलम ५१

२. महाराष्ट्र शासन क्रमांक करोना२०२०/प्रा.क्र.५८/ आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण.**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**
**क्र.कक्ष/ कोरोना विषाणू/१०४/२०२०**
**नाशिक दिनांक :-१४/०३/२०२०**

**आदेश**

राज्य शासनाने करोना विषाणूचा ( कोव्हीड १९ ) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करून खंड २,३,व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नाशिक जिल्ह्यामध्ये सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार दिनांक ३१ मार्च २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि , या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील १० व १२ च्या परीक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे हे स्पष्ट करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबधित संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

तरी उपरोक्त निर्देशानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त आदेशाचे अवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने भारतीय दंड संहिता १८६० (४५) याच्या कलम १८८ शिक्षेसपात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि पुढील कार्यवाही करण्यात येईल.

१४/३

**(सूरज दि मांढरे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नाशिक**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

प्रती -१. सर्व विभाग प्रमुख ------------------------------------------------------ जिल्हा नाशिक

प्रत- १. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर